नवी मुंबईच्या राजाच्या दर्शनास मान्यवरांची मांदियाळी

नवी मुंबई : नवसाला पावणारा नवी मुंबईचा राजा म्हणून ख्याती असलेल्या शिवछाया मित्र मंडळाच्या गणरायाचे लाखो भाविकांबरोबर भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावन्नकुळे, आमदार मंदाताई म्हात्रे, नवी मुंबईचे पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक तथा उपाध्यक्ष डॉ.संजय मुखर्जी, अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांनी गणरायाचे दर्शन घेतले आहे.

रेल्वे प्रशासनाकडून खोटी माहिती दिली जात आहे !

आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड यांचा आरोप

यामध्ये कोणतीही राजकीय भूमिका नाही !

हा मुद्दा कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा कळवा- मुंब्र्यापुरता मर्यादित नाही. याविषयी आता प्रत्येक स्टेशनवर चीड निर्माण होताना दिसत आहे. गर्दीमुळे मृत्युचे प्रमाण वाढत आहे. माणुसकीशी होणारा हा खेळ आता जर शांतपणे बघणार असू तर आपण राजकारणात राहू नये, असे आपले मत आहे. आपण पक्षीय राजकारण न करता केवळ रेल्वे प्रवाशांच्या भूमिका मांडतोय; त्यात आपली राजकीय भूमिका नाही असे स्पष्ट केले.

वार्ताहर/ठाणे

एसी लोकलची मागणी वाढली असून गेल्या काही महिन्यात रेल्वेच्या उत्पन्नात वाढ झाल्याची माहिती काही दिवसांपूर्वी रेल्वे प्रशासनाने दिली होती, मात्र ही माहिती धतांग खोटी असून रेल्वे प्रशासन खोट बोलत आहेत. रेल्वे प्रशासन प्रवाशांची दिशाभूल करत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. बुधवारी पत्रकार परिषदेत आव्हाड यांनी एसी लोकल संदर्भात आपली भूमिका स्पष्ट करत येत्या काळात प्रवासीच तीव्र आंदोलन छेडतील असा इशारा यावेळी आव्हाड यांनी दिला.

रेल्वे हा देशातील ऐतिहासिक 'गेंडा' असून त्यांना ऊन, वारा, पाऊस, इंजेक्शन वगैरे काही चालत नाही. त्यांच्यावर असरच होत नाही. पुढील आंदोलन हे आपल्या हातात नाही. तर ते जनतेच्या हातात आहे. मध्यमवर्गीयांच्या मनात आता रेल्वेच्या बाबतीत राग पेटतोय; ते आता रेल्वेला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाहीत. जर, सकाळच्या वेळी सर्व प्रवासी अर्धा तास आधी येऊन रेल्वे स्थानकातील फलाटावरच मांडी घालून बसले तर काय होईल? प्रवाशांना बंदूकधारी पोलीस घाबरवतात, हे आता जनता सहन करणार नाही, असा इशारा डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी दिला. एसी लोकलच्या संदर्भात पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर ते बोलत होते.

एसी लोकलच्या विरोधातील पहिले आंदोलन हे कळव्यातून सुरु झाले. त्यानंतर बदलापूर आणि ठाण्यात झाले. पण, सर्वाधिक प्रतिसाद हा ठाण्यातून मिळत आहे. ठाण्यातून सुटणारी ९ वाजून ३ मिनिटांची एक लोकल रद्द केली आहे. या लोकलमधून सर्व मंत्रालयीन कर्मचारी मुंबईला जायचे. त्याच लोकलच्या वेळेवर आता एसी लोकल चालविली जात आहे. आमचे हेच म्हणणे आहे की एसीच्या १०० गाड्या चालवा; पण, ज्या गरीबांच्या, नोकरदार वर्गाच्या लोकल आहेत त्या साध्या लोकलवर अन्याय का करता? यामुळे शांत असलेले वातावरण अधिक पेटवले जात आहे.

एसी लोकलला चांगला प्रतिसाद मिळत असल्याच्या बातम्या रेल्वेकडून प्रसारीत केल्या जात आहेत. पण, एसी लोकलमध्ये नृत्य करता

नवी मुंबईत पहिल्यांदाच ऐतिहासिक जिवंत देखावा

नवी मुंबई : सध्या संपुर्ण महाराष्ट्रभर गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. अश्यात अनेक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी आपल्या बाप्पासाठी आकर्षक सजावट केली आहे. याच सजावटीमधून अनेक मंडळांनी सामाजिक संदेशही दिला आहे. दरम्यान, नवी मुंबईतल्या कोपरखैरणेतील श्रीस्वामी समर्थ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने आगळीवेगळी परंपरा जपत यंदा ११,०० जपमाळ आणि रुद्राक्षांपासून श्रींची मूर्ती साकारली आहे.

मंडळाचे संस्थापक नारायण शिंदे (अण्णा), प्रमुख सल्लागार नगरसेविका सायली नारायण शिंदे, अध्यक्ष आशिष सणस, खजिनदार जयदिप जाधव, उपखजिनदार नीरज सुयंवशी, सचिव अजय सावंत, उपसचिव आशिष निकम यांसह मंडळातील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी या देखाव्यासाठी विशेष मेहनत घेतली आहे. या देखाव्यात रोहित पवार, वैभव बनकर, अनिकेत वारे, रामेश्वर डोके, समाधान जाधव, रविंद्र केसरकर, सुजित भोये, श्रेया ढवळे, अनुजा सुर्वे, अथर्व सुर्यवंशी, शुभम पवार, ओमकार धामणकर, दत्तात्रय गुजर हे कलाकार ऐतिहासिक भुमिका साकारत आहेत.

याचसोबत नवी मुंबईमध्ये पहिल्यांदाच ऐतिहासिक सजीव देखावा साकारत हे मंडळ नवी मुंबईकरांचे लक्ष वेधून घेत आहे. रविवार दिनांक ४ सप्टेंबरपासून ८ सप्टेंबरपर्यंत रात्री साडे आठ ते दहा या वेळेत हिंदवी स्वराज्यातील ऐतिहासिक घटनेवर आधारित गड आला पण सिंह गेला हा जिवंत देखावा सर्व गणेश भक्तांना पाहता येणार आहे.

अनधिकृत बांधकामांवर धडक कारवाई

नवी मुंबई: नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ए विभाग बेलापूर अंतर्गत शहाबाजगांव, बेलापूर, नवी मुंबई येथील घर नं. ६००/०२ प्लिथंचे बांधकाम पूर्ण झालेले असून गाऊंड प्लोअर स्लॅबचे बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेचे कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे सुरु केले होते. या अनधिकृत बांधकामास ए विभाग बेलापूर कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. अनधिकृत बांधकामावर ए विभाग बेलापूर कार्यालयामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात येऊन हे अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले.

PUBLIC NOTICE

"Our client (purchaser) **Mrs. Chitra Samir Shah and Ms. Shaila Vishvanath Karnik** intending to buy a premises being **Flat No. 301 on 3rd Floor, Sheetal CHS. Ltd. Jayprakash Nagar, Goregaon (East), Mumbai 400063**; from **Mr. Sanjay Rajaram Sawant** who has acquired the above premises as a legal heir of late **Mr. Rajaram K. Sawant (expired on 15/02/2015)** and **Mrs. Neela R. Sawant (expired on 01/09/2003)**. Release Deed dated 08/02/2018 of all the legal heirs is on record. If anybody has any objection or claim, intimate at above address within 15 days from the date of this notice."

Place : Mumbai **Balchandra M. Ganu**
Date : 08/09/2022 Advocate High Court

जाहीर सूचना

सर्व जनतेला याद्वारे कळण्यात येते की, आमचे अशिल सौ. सीमा मोहित मित्तल हे एक श्री. कह्लारकल मॅथ्यु राहणार येथे १६०४, ओडिसी-खख सीएचएस लि., हिरानंदानी गार्डन्स, पवई, मुंबई-४०००७६ यांच्याकडून खालील परिशिष्टातील मिळकत खरेदी करण्यास इच्छुक आहेत:

प्लॉट क्र.४७/४८, मोज क्षेत्र ०-४२-५ हेक्टर, गाव भेलिव, तालुका सुधागड, सर्वे क्र.१६२/३, महाराष्ट्र राज्य.

कोणतीही व्यक्ती किंवा पक्ष किंवा संस्था ज्यांना कोणताही हक्क, धारणाधिकाराच्या सुकृताद्वारे, भाडेपट्टा, गहाण, कर्ज, आगाऊ किंवा विक्री किंवा भाग विक्री किंवा अन्यकाही जर असल्यास तसे वकीलांना रितसर स्व-साक्षांकित दस्तावेजांसह या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १४ दिवसांत कळवावे त्यानंतरची कोणतीही माहिती ही त्यागीत आणि परित्यागीत मानले जातील आणि दावे भविष्यात दुर्लक्षित केले जातील. विक्री ची प्रक्रिया ही नोंदणीकृत केली जाईल आणि कब्जा घेतला जाईल.

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०८/०९/२०२२

आय.ए. शेख वकील
समिर बाग, चिल्ड्रन्स ॲकेडमी
स्कूलसमोर, अशोक नगर,
कांदिवली पूर्व, मुंबई-४००१०१.
मोबाईल क्र.९३२०१ ६५०८९
ईमेल: iashaikhadv@yahoo.com

सशस्त्र दरोड्याप्रकरणी आठ आरोपी अटकेत

वार्ताहर/उल्हासनगर

उल्हासनगर शहरातील एका सिंधी पुजाऱ्याच्या घरात घुसून लहान मुलीच्या गळ्यावर चॉपर ठेवत लाखो रुपयांचे दागिने आणि रोख रक्कमेवर डल्ला टाकून गुन्हेगार चार चाकी गाडीतून पळून गेले होते. ही सर्व घटना शेजारच्या सिसीटीव्हीमध्ये कैद झाली होती.

या प्रकरणात विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने शिवा निंबाळकर याच्यासह चार जणांना विविध ठिकाणाहून अटक केली आहे. तसेच उल्हासनगर आणि कल्याण क्राईम ब्रांचच्या शाखेने देखील या प्रकरणात चार आरोपींना अटक केली आहे.

जीवे ठार मारण्याचा धाक दाखवत आरोपींनी घरातील तब्बल १० लाखांपेक्षा जास्त किंमतीचे दागिने आणि ८० हजार रुपयांची रोकड चोरी करून धूम ठोकली होती. विशेष म्हणजे जग्यासी यांच्या घरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या डीव्हीआर देखील या दरोडेखोरांनी आपल्या सोबत नेला होता.

हा सशस्त्र दरोडा असल्याने कल्याण गुन्हे शाखा, ठाणे गुन्हे शाखा त्याचबरोबर उल्हासनगर गुन्हे शाखा या घटनास्थळी दाखल होत समांतर तपास सुरू केला. गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक मौराळे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली होती.

७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना परिवहन सेवा मोफत

ठाणे: स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधून ठाणे शहराच्या हद्दीत राहणाऱ्या ७५ वर्षांपुढील ज्येष्ठ नागरिकांसाठी ठाणे महापालिकेच्या परिवहन सेवेच्या बसमधून मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. या सेवेचा लाभ ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना घ्यावा असे आवाहन प्रशासक तथा महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा व परिवहन समिती सभापती विलास जोशी यांनी केले आहे.सदर ओळखपत्र तीन वर्षे कालावधीसाठी असून, त्याकरिता सेवाआकार शुल्क आकार २७ रुपये आकारण्यात येईल.

जाहीर सूचना

स्वांनाकळ विण्यात येते की, पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने राज्यस्तरीय पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरणाने (एस ई आय ए ए) महाराष्ट्रा ने जारी केले ले, प्रस्ताव क्रमांक एस आयए/एमएच/एमआयएस/241936/2021 आणि ईसी ओळख क्रमांक ईसी22बी038 एमएच 199918 दिनांक 01 जून 2022 आणि शुद्धि पत्रक एस आय/एम एच/एमआयएस/279215/2022 दिनांक 26 ऑगस्ट 2022 रोजी धारक सीटीएस क्रमांक 263/ब, बोरीवली गावातील 18.30 मी रुंद स्थित, महिषा मर्दिनी मंदिर मार्ग, जयराज नगर, बोरीवली (प), महाराष्ट्र – 400091, येथे स्थित असलेल्या भूखंडा वरील प्रस्तावित पुनर्वसन प्रकल्पा साठी पर्यावरणीय मंजुरी दिली आहे. सदर मंजुरी पत्राची http://parivesh.nic.in वेबसाइट वर पाहता येईल.

मे. एन. एच. आय डेव्हलपर्स एलएलपी
दिनांक : 07/09/2022 हस्ताक्षर
स्थान: मुंबई एल पी पार्टनर

गाळा क्र. १ आणि २ सत्यदीप इमारत, दर्शन टॉवर, च्या मागे चिकूवाडी, बोरीवली (पश्चिम) मुंबई, महाराष्ट्र – 4000092

C/o/n/v/e/y

प्रीमियर लिमिटेड (सीआयआरपीमध्ये)
सीआयएन: एल३४१०३पीएन१९४४पीएलसी०२०४२
नोंदणीकृत कार्यालय : १६९ गट गाव सावरदरी, तालुका खेड (चाकण औद्योगिक क्षेत्र), पुणे – ४१०५०१. । दूर. : + ९१ २१३५६८३२०
कॉर्पोरेट कार्यालय : ५८, नरिमन भवन, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१, भारत.
दूर. + ९१ २२ ६११७९००० फॅक्स + ९१ २२ ६११७९००३
ई-मेल : investors@premier.co.in वेबसाइट : www.premier.co.in

व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून आयोजित करण्यात येत असलेली कंपनीच्या ७६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची (एजीएम) सूचना, बुक क्लोजर व परोक्ष ई-मतदानाची माहिती

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, प्रीमियर लिमिटेड (कंपनी) च्या सभासदांची शहात्तरावी (७६ वी) वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) एजीएमच्या सूचनेत विहित विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी **शुक्रवार, दि. ३०.०९.२०२२ रोजी दु. १२.३० वा. (भा. प्र. वे.)** केवळ व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) सुविधा/अदर ऑडिओ व्हिज्युअल मीन्स (ओएव्हीएम) च्या माध्यमातून आयोजित करण्यात येत आहे. कॉर्पोरेट कामकाज मंत्रालय तसेच भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (सेबी) यांच्याद्वारे जारी सर्वसाधारण परिपत्रकांच्या अनुपालनांतर्गत ज्या सभासदांची ई-मेल पत्ते कंपनी वा रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट व डिपॉझिटरीज् यांच्याकडे नोंदवलेले असतील केवळ अशा सभासदांना वार्षिक अहवाल २०२१ – २२ समवेत ७६ व्या एजीएमची सूचना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवण्यात आली आहे. एमसीए परिपत्रके व सेबी परिपत्रकांच्या अनुपालनांतर्गत एजीएमच्या सूचनेच्या प्रत्यक्ष प्रतींच्या पाठवणीची आवश्यकता रद्दबातल आहे.

अन्य बाबींबरोबरच, ७६ व्या एजीएमच्या सूचनेचा समावेश असलेला कंपनीचा वार्षिक अहवाल २०२१-२२ ठराव अधिकाऱ्यांची (आरपी) वेबसाइट अर्थात https://sunresolution.in/premier-limited-agm/ वर तसेच स्टॉक एक्सचेंज वेबसाइट www.bseindia.com व www.nseindia.com वरही उपलब्ध आहे. सूचनेची प्रत लिंकइनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एलआयआयपीएल) ची वेबसाइट https://instavote.linkintime.co.in वरही उपलब्ध आहे. ई-मतदान प्रक्रिया व परोक्ष ई-मतदानाकरिता परीनिरीक्षक म्हणून मे. अनीशा झुनझुनवाला ॲन्ड असोसिएट्स, कार्यरत कंपनी सचिव (सीओपी नं. २०९६७) यांची नेमणूक करण्यात आली आहे.

कंपन्या कायदा, २०१३ (कायदा) चे अनुच्छेद १०८ सहवाचन कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ चे नियम २०, वेळोवेळी सुधारित केल्यानुसार, आयसीएसआयद्वारे जारी सर्वसाधारण सभांवरील सचिवालयीन निकष (एसएस-२) व सेबी (एलओडीआर) २०१५ चे विनियमन ४४ यांच्या अनुपालनांतर्गत कंपनी आपल्या सभासदांना एजीएमच्या सूचनेत विहित विषयांसंदर्भात एजीएमपूर्वी परोक्ष ई-मतदानाद्वारे तसेच एजीएमदरम्यान मत देण्यासाठीची सुविधा उपलब्ध करून देत आहे. कंपनीने इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून मतदान सुविधा उपलब्ध करण्यासाठी एलआयआयपीएल यांची नेमणूक केली आहे.

परोक्ष ई-मतदानाकरिताचे विस्तृत निर्देश एजीएमच्या सूचनेत दिलेले आहेत. सभासदांनी कृपया खालील बाबींचे पालन करावे :

ए) खालील कालावधीदरम्यान परोक्ष ई-मतदान सुविधा उपलब्ध असेल :

परोक्ष ई-मतदानाचा प्रारंभ :	२७.०९.२०२२, मंगळवार – स. ९.०० वा.
परोक्ष ई-मतदानाची समाप्ती :	२९.०९.२०२२, गुरुवार – सायं. ५.०० वा.

तत्पश्चात एलआयआयपीएल यांच्याद्वारे परोक्ष ई-मतदानाचे मोड्युल अकार्यरत करण्यात येईल आणि सदर तारीख वबेळेपश्चात सभासदांना इलेक्ट्रॉनिक स्वरूपात मत देण्याची परवानगी नसेल.

बी) सभासदांचा मतदान हक्क हा शुक्रवार, दि. २३.०९.२०२२ (निर्धारित अंतिम तारीख) रोजीनुसार कंपनीच्या प्रदानित समभाग भांडवलातील त्यांच्या हिश्श्याच्या प्रमाणात असेल. सभेदरम्यानही परोक्ष ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल व ज्यासभासदांनी याआधी परोक्ष ई-मतदानाद्वारे आपले मत दिलेले नसेल असे सभेस उपस्थित सभासद सभेदरम्यान मतदानाचा हक्क बजावू शकतील. निर्धारित अंतिम तारखेनुसार सभासदांचे रजिस्टर/लाभार्थी मालकांच्या रजिस्टरमध्ये नाव नोंद असलेली व्यक्तीच केवळ एजीएमपूर्वी / दरम्यान परोक्ष ई-मतदान सुविधा प्राप्त करण्यास पात्र असेल.

सी) एखाद्या व्यक्तीने कंपनीचे शेअर्ससंपादित केले असतील सूचनेच्या पाठवणीपश्चात कंपनीचा सभासद बनला असल्यास वनिर्धारित अंतिम तारखेनुसार भागधारक असल्यास सदर व्यक्ती enotices@linkintime.co.in येथे विनंती पाठवून परोक्ष ई-मतदानाकरिता लॉग इन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकेल किंवा एलआयआयपीएलद्वारे उपलब्ध दूरध्वनी क्र. ०२२-४९१८६१७५ वर संपर्क साधता येईल. निर्धारित अंतिम तारखेस सभासद नसलेल्या व्यक्तीने सदर एजीएमची सूचना केवळ माहितीसाठी समजावी.

डी) सभेच्या आधी परोक्ष ई-मतदानाद्वारे आपले मत दिलेले सभासद सभेमध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध राहू शकतील, परंतु त्यांना पुन्हा मत देता येणार नाही.

वरील प्रणालीअंतर्गत सभासदांना त्यांचा बँक खाते तपशील अद्ययावत करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येत आहे. आपल्या ई-मेल पत्त्याच्या स्थायी नोंदणीकरणाकरिता डीमॅट स्वरूपातील भागधारक असलेल्या सभासदांनी त्यांचे नाव त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे अद्ययावत करावे व कागदोपत्री स्वरूपातील भागधारक असलेल्या सभासदांनी लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंट) यांच्याकडे अद्ययावत करावेत.

परोक्ष ई-मतदानाशी संबंधित कोणत्याही चौकशी/तक्रारीकरिता कृपया https://instavote.linkintime.co.in च्या Help section अंतर्गत उपलब्ध फ्रिक्वेंटली आस्क्ड क्यूश्चेन्स (एफएक्युस) आणि इन्स्टावोट ई-व्होटींग वाचावे किंवा enotices@linkintime.co.in येथे ई-मेल लिहावा किंवा ०२२ – ४९१८६००० वर संपर्क साधावा.

एजीएममध्ये प्रवेश व सहभागाकरिता एजीएमपूर्वी/दरम्यान तांत्रिकी सहाय्य आवश्यक असलेल्या सभासदांनी instameet@linkintime.co.in येथे (ई-मेल) संपर्क साधावा किंवा ०२२-४९१८६१७५ वर संपर्क साधावा.

बुक क्लोजर:

कायद्याचे अनुच्छेद ९१ व त्याअंतर्गत संस्थापित नियमांच्या अनुपालनांतर्गत पुढे सूचना देण्यात येत आहे की, ७६ व्या एजीएमच्या निमित्ताने कंपनीचे सभासदांचे रजिस्टर व शेअर ट्रान्सफर बुक्स दि. २४.०९.२०२२ ते दि. ३०.०९.२०२२ (दोन्ही दिवस समाविष्ट) दरम्यान बंद राहतील.

प्रीमियर लिमिटेडकरिता
सही/-
कनक जानी
ठराव अधिकारी

ठिकाण : पुणे
दिनांक : ०८.०९.२०२२

जाहीर सूचना

राज्यस्तरीय पर्यावरण परिणाम प्रमाणन प्राधिकरण महाराष्ट्र
(STATE LEVEL ENVIRONMENT IMPACT ASSESSMENT AUTHORITY MAHARASHTRA)
पर्यावरण विभाग, २ रा मजला, खोली क्र. २१४, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

मे. अनंता लॅण्डमार्क्स प्रा. लि. द्वारे गाव बाळकुम, ठाणे येथे प्लॉट धारक स क्र. २१२/१, २१२/२ए, २१२/३ए, २१२/४ए, २१३/१ए, २२९/१/२ए, २२९/२/२ वर प्रस्तावीत पुर्नविकास. गाव माजिवाडा, ठाणे येथे प्लॉट धारक स क्र. ११३ / १ (भाग), ११३ / २बी, ११३/३ (भाग), ११३/४, ११३/५, ११३/६, ११३/७, ११३/८, ११३/९/२, ११३/१०, ११३/११, ११३ /१२ (भाग), ११३/१३, ११३/१४, ११३ / १६ए. ११३ / १६बी, ११३/१७ए, ११३/१९बी/१, ११४/१/बी. ११४/२/बी, ११४/३, ११४/४, ११४/५, ११४/६, ११४/७, ११४/८, ११४/९ए, ११४/१०ए, ११४/१०सी, ११५/४/२, ११५/५, ११५/६, ११५/७/२, ११५/८/२, ११५/९, ११५/१०/२, ११५/११, ११५/१२, ११५/१३, ११५/१४, ११५/१५ वर प्रस्तावीत रहिवासीत आणि कमर्शिअल डेव्हलपमेंट करीता २६.०८.२०२२ रोजी दिनांकीत फाईल क्र. एसआयए /एमएच/एमआयएस / - ७१४६५ / २०२१ अन्वये ईसी धारक क्र. द्वारे पर्यावरण निपटारा मंजूर केला.

निपटारा पत्राची प्रत महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ (http://parivesh.nic.in) कडे उपलब्ध आहे.

संचालक
मे. अनंता लॅण्डमार्क्स प्रा. लि.
१०१, कल्पतरु सिनर्जी, ग्रॅण्ड हयात समोर, सांताक्रुझ (पू), मुंबई- ४०० ०५५

जाहीर सूचना

आमचे अशील **मेसर्स यश आकार डेव्हलपर्स एलएलपी,** एक मर्यादित देयता भागीदारी संस्था, ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय ३०७/३०८, ३रा मजला, धीरज हेरिटेज, एस. व्ही. रोड आणि मिलन सबवे रोड चे जंक्शन, सांताक्रूझ (प), मुंबई – ४०० ०५४ येथे आहे, यांनी आपल्या नामांकित भागीदार: यश रमेश पारेख यांच्या माध्यमाने पीरामल नगर बिल्डिंग क्र. ९, एस. व्ही. रोड, गोरेगांव (प), मुंबई – ६२, येथील सर्व्हे क्र. ५५, व्हिलेज पहाडी गोरेगांव, तालुका – बोरीवली, रजि. जिल्हा, मुंबई उपनगर ची मोजमाप ३८,११७.६७ चौ. मी. अशा मोठ्या मालमत्तेच्या भागस्वरूपातील मोजमाप १३४६.५० चौ. मी. किंवा जवळपास ची सी.टी.एस. क्र. ९०३/२ धारक प्लॉट क्र. VIB येथे उभी असलेल्या इमारतीसह **प्रेस्टीज पीरामल को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमि.** (बीओएम/एचएसजी/५११९/१९७७) यांच्या मालकीच्या मालमत्ते (सदर मालमत्ता) संदर्भात अनुक्रमांक बीआरएल-९-११५१५-२०२१ अंतर्गत बोरीवली – IX येथे सब-रजिस्ट्रार ऑफ ॲश्योरेंसेस यांचेकडे रीतसर नोंदणीकृत अशा नोंदणीकृत विकास करार दि. १३.०९.२०२१ च्या अनुपालनेत विकास हक्क अधिग्रहित केले आहेत.

कोणीही व्यक्ती ज्यांचे सदर मालमत्ते विरुद किंवा त्यावर किंवा त्या मध्ये विक्री, विनिमय, वारसाहक्क, करार, कंत्राट, गहाण, सुविधाधिकार, बक्षीस, भाडेपट्टा, भाडेकरू, लीव ॲण्ड लायसंस, ग्रहणाधिकार, प्रभार, विश्वस्त, निवासी हक्क, देखभाल, न्यायालयीन आदेश, खटला, डिक्री किंवा इतर भार इत्यादि माध्यमाने कोणताही दावा असेल तर त्यांना याद्वारे कळविण्यात येते की त्यांनी सदरहू सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत खालील स्वाक्षरीदारांना समर्थनीय कागदोपत्री पुराव्यांसह याची माहिती लेखी स्वरूपात द्यावी.

दिनांक ०८ सप्टेंबर २०२२.

स्वाक्षरी/-
पियुष शाह ॲण्ड ॲसोसिएट्स,
ॲडव्होकेट्स ॲण्ड सॉलिसिटर्स,
महेंद्र खिमजी शाह,
ॲडव्होकेट हायकोर्ट,
पियुष महेंद्र शाह,
ॲडव्होकेट ॲण्ड सॉलिसिटर,
४०६, हमाम हाउस, हमाम स्ट्रीट, अंबालाल दोशी मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०० ००१

बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

झोनल स्ट्रेस्ड ॲसेट रिकव्हरी ब्रांच : मेहेर चेंबर, तळ मजला, डॉ. सुंदरलाल बहल मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४००००१. दूरध्वनी: ०२२-४३६८३८०३, ४३६८३८१०, फॅक्स : ०२२-४३६८३८०२
ईमेल: armbom@bankofbaroda.co.in

जोडपत्र IV
(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चा नियम ८(१))
कब्जा सूचना
(स्थावर मिळकतीकरिता)

ज्याअर्थी,

निम्नस्वाक्षरीकार यांनी **बँक ऑफ बडोदा झेडओएसएआरबी – मुंबई** चे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲंड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (ॲक्ट), २००२ (५४ सन २००२) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चा (नियम ३) सहवाचता कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून **२१/०७/२०१६** रोजी मागणी सूचना जारी करून कर्जदार **– मे. कावेद स्टील प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड (कर्जदार), श्री. योगेश एस सरस्वते (संचालक/हमीदार), श्री. शैलेश शशिकांत सरस्वते (संचालक/हमीदार), श्री. नरेश भुमय्या रुद्र (हमीदार), मे. मारुती स्ट्रीप्स ॲण्ड फेरो ॲलॉयज् प्रायव्हेट लिमिटेड (कॉर्पोरेट हमीदार)** यांना सूचनेमध्ये नमूद केलेली रक्कम **रु. ३,१६,२३,०००/- (रुपये तीन कोटी सोळा लाख तेवीस हजार मात्र)** ही रक्कम सदरहू सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत चुकती करण्यासाठी सांगितले होते.

कर्जदार/हमीदार/गहाणदार/संचालक यांनी सदरहू रक्कम चुकती करण्यामध्ये कसूर केलेली आहे, विशेषत: कर्जदार/हमीदार/गहाणदार/संचालक आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी येथे याखाली वर्णिलेल्या मिळकतीचा कब्जा सदर ॲक्टचे कलम १३ चे उप-कलम (४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून **ह्या ५ सप्टेंबर, २०२२** रोजी घेतलेला आहे.

विशेषत: कर्जदार/हमीदार/गहाणदार/संचालक आणि अन्य आणि सर्वसामान्य जनता यांना याद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करू नये आणि सदरहू मिळकतीवरील कोणताही देवघेवीचा व्यवहार हा बँक ऑफ बडोदाच्या **रक्कम रु. ३,१६,२३,०००/- (रुपये तीन कोटी सोळा लाख तेवीस हजार मात्र)** आणि त्यावरील व्याजाच्या भाराअधीन राहील.

तारण मत्तांच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेत कलम १३ च्या पोट-कलम (८) च्या तरतुदींनुसार कर्जदार/हमीदार/गहाणदार/संचालक यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

जंगम/स्थावर मिळकतीचे वर्णन

१) पिंपरी, वाघेरे, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथे स्थित प्राईड प्लाझा अशा नावाच्या इमारतीमधील तळ मजल्यावरील शॉप क्र. ७ मोजमापित २२५ चौरस फूट म्हणजेच २०.९१ चौरस मीटर (बिल्ट अप), सर्व्हे क्र. १५७, हिस्सा क्र. डी/१ए/१.
२) पिंपरी इंडस्ट्रियल एरिया, मोजमापित ६०० चौरस मीटर, गाव भोसरी, तालुका हवेली, जिल्हा पुणे मध्ये स्थित प्लॉट क्र. एस – २१०.
३) गट क्र. १३९८, १४०० ते १४०५, १४०७ ते १४१३, १५५५, १५५६, प्लॉट क्र. १६, एकूण प्लॉट क्षेत्र मोजमापित ४३९८४.१९ चौरस फूट म्हणजेच ४०८७.७५ चौरस मीटरपैकी मोजमापित ८४९६ चौरस फूट म्हणजेच ७८९.६० चौरस मीटर (त्यासह मोकळ्या जागेचा वापर, भोगवटा आणि सुविधाधिकार), गाव शिक्रापूर, तालुका शिरूर, जिल्हा पुणे.

सही/-
दिनांक : ०५/०९/२०२२ **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण : पुणे **बँक ऑफ बडोदा**

मुंबई येथील न्यायमंडळाच्या उच्च न्यायालयामध्ये
इच्छापत्र आणि संपत्ती क्षेत्राधिकार याचिका
क्र. २०२१ चा २७६४ उद्धरण

सरस्वती हनुमंत बोडेवाल उर्फ सरस्वती हनुमंत बोडेवाल यांचा अंतिम इच्छपत्र आणि मृत्युपत्र खरे आहे हे ठरविण्यासाठी याचिका, हिंदू, मुंबईचे भारतीय रहिवासी, विधवा, व्यवसाय: गृहिणी, जी तिच्या मृत्यूच्या वेळी फ्लॅट क्रमांक बी-१/५०५ येथे राहात होती. सहकारी गृह निर्माण संस्था डठअ, मातोश्री रमाबाई मार्ग, लिबर्टी गार्डनच्या मागे, मालाड, पश्चिम, मुंबई ४०० ०६४ ...मृत सुरेश श्रीपत पाटील, वय: ६२ वर्षे. हिंदू, मुंबईचे भारतीय रहिवासी, व्यवसाय: सेवानिवृत्त, फ्लॅट क्रमांक इ-१/५०५ येथे राहणारे, सहकारी गृह निर्माण संस्था डठअ, मातोश्री रमाबाई मार्ग, लिबर्टी गार्डनच्या मागे, मालाड (प.), मुंबई ४०००६४ मुदतीनुसार एकमेव कार्यकारी वरील नावाच्या मृत व्यक्ती